ISSN 0976-0377
RNI. MAHMUL02805/2010/33461

International Registered & Recognized
Research Journal Related To Higher Education for all Subjects

# INTERLINK RESEARCH ANALYSIS

Editor In Chief
Dr. Balaji Kamble

RNI. MAHMUL02805/2010/33461
Interlink Research Analysis
IMPACT FACTOR 4.20
ISSN 0976-0377
Issue:XV, Vol. X, July 2017 To Dec. 2017

# INDEX



| Sr. No | Title for Research Paper | Page No |
|---|---|---|
| 1 | A Study of Stress of Teacher Educations in B. Ed. Colleges-Special Reference to Nanded City<br>**Dr. Somnath Kishanrao Pachling** | 1 |
| 2 | Tradition and Modernity in R. K. Narayan's 'The Bachelor of Arts'<br>**R. H. Sagar** | 7 |
| 3 | पर्यटन विकासात शासनाची भूमिका<br>**डॉ. बालाजी वसंतराव चिलर्गे** | 14 |
| 4 | मेक इन इंडिया : एक चिकित्सक अभ्यास<br>**बी. आर. कुंडगीर** | 20 |
| 5 | शिक्षणशास्त्र महाविद्यालयामधील प्रशिक्षणार्थ्यांचे सराव अध्यापनातील व्यवस्थापन कौशल्य : एक अभ्यास<br>**डॉ. मधूकर पुंडगे** | 26 |
| 6 | उपेक्षीताचा पूर्व इतिहास आणि आधुनिक युगातील उपेक्षीत व संरक्षणाबाबत उपाय<br>**डॉ. डी. ए. पाईकराव** | 31 |
| 7 | ऊर्मिला सिरुर यांच्या कथेतील अनुभवविश्व<br>**डॉ. सुनीता सांगोले** | 37 |
| 8 | क्रीडा शिक्षकाचे सामाजिक योगदान : एक चिकित्सक अभ्यास<br>**डॉ. बी. एन. गपाट** | 45 |
| 9 | परराष्ट्र धोरण स्वरुप आणि उदिष्टये : एक चिकित्सा<br>**डॉ. एस. व्ही. शेटे** | 49 |

RNI. MAHMUL02805/2010/33461
Interlink Research Analysis
IMPACT FACTOR 6.20
ISSN 0976-0377
Issue : XV, Vol. X, July 2017 To Dec. 2017 

# उर्मिला सिरुर यांच्या कथेतील अनुभवविश्व

**डॉ. सुनीता सांगोले**
मराठी विभाग,
दयानंद कला महाविद्यालय,
लातूर, जि. लातूर

7 **Research Paper - Marathi**

मराठी साहित्यात मोजके पण सकस लेखन करणाऱ्या उर्मिला सिरुर यांचा 'कवडसा' हा कथासंग्रह, 'असिम' हे दुसरे पुस्तक आणि तिसरे प्रकाशनाच्या वाटेवर आहे. कवडसा या कथासंग्रहात असणाऱ्या प्रत्येक कथा या मानवी नात्याचे वेगळे भावबंध निर्माण करणाऱ्या आहेत. प्रस्तुत लेखात कडवसा मधील कथांच्या अनुषंगाने स्त्रियांचे भावविश्व जोखण्याचा प्रयत्न केला आहे. उर्मिला सिरुर यांच्या कथांमधून चिंत्रित झालेले अनुभवाचे अनेकविध पैलू आपणास पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**स्त्रियांचा एकाकीपणा :**

एकाकीपणा हा जणू स्त्रीजातीला लागलेला शापच आहे. याची जाणीव उर्मिला सिरुर यांच्या बहुतेक कथांमधून होते. त्यांच्या नायिका या सुशिक्षित आहेत , तरीही परंपरेला त्या झुगारुन देऊ शकत नाहीत. या दोन्हीचे द्वंद आणि पुरुषप्रधान मानसिकतेतून आलेले संकेत यामुळे स्त्रियांच्या वाटयाला आलेले एकटेपणाचे दुःख अतिशय संवेदनशिलतेने लेखिकेने टिपले आहे. या दृष्टीने त्यांची 'गज','अंतर', 'चेटूक', 'प्रॉमिस', 'महाव्रत' या कथा लक्षात घेण्यासारख्या आहेत.

'गज' कथेची नायिका अभ्यासू आहे. लिहिण्याची उर्मी तिच्यात आहे. चिंतनाचा एक धागा सदैव तिच्या विचारात असतो, पण ती अगतिक आहे. विस्कटलेले कोरे कागद जुळवून ती अक्षरे उमटवण्याचा प्रयत्न करतेय, पण तिला स्वतःच्या नावाखेरीज दुसरे कांहीच लिहिता येत नाही, मुलं, नवरा आणि एकूणच सगळा संसार यात ती इतकी गुरफटलेली आहे की, स्वतःचे अस्तित्व ती विसरुन गेली आहे. आपली सगळी प्रतिभा थकली आहे, याची जाण तिला आहे, पण ती कांहीच करु शकत नाही. सगळ्या धावपळीत ती शेवटी टेबलावरचे कागद एकवर एक रचून ठेवते. तिचा नवरा तिच्याकडे बघत म्हणतो " तुला चेहरा आहे..... लक्षात आहे तुझ्या ?" (पृ.७४) यावर ती म्हणते " फक्त चेहराच ?" तिच्या या उत्तराने खूप कांही सांगितले आहे. रात्री झोपताना तो विचारतो,"काय

उघड करत असल्याचे वाटते. कारण सर्व बाजूने परिस्थिती अनुकूल असतानाही त्यातून बाहेर पडण्याची त्यांची इच्छा नसते. उलट आपले आयुष्य हे त्या पुरुषाशिवाय असूच शकत नाही. याचाच विचार करुन त्या नायिका आपल्या प्रेमाशी घट्ट राहण्याचा पारंपारिक दृष्टीकोन तसाच कृतीत आणताना दिसतात. एकीकडे स्वतंत्र विचारसरणी तर दुसरीकडे परंपरेचे जोखड त्या झुगारुन देऊ शकत नाहीत. अशा द्वंद्वात सापडलेल्या नायिकांचे अनुभवविश्व या कथा रेखाटतात. स्त्रिचा म्हणून अनुभव व्यक्त करताना काळानुरुप स्त्रिच्या भावविश्वात होणारे बदल समाज स्विकारत नाही. अशा त्रिशंकू अवस्थेत असलेल्या स्त्रीचे चित्रण या कथांतून येते. स्त्रीची ही सामाजिक स्थिती-गती प्रकट करणाऱ्या नव्या वळणाच्या आशय समृद्ध कथा म्हणून या कथांचे वेगळेपण मनात भरते.

एकंदरीत एक नव्या वळणाची अणि आशयसमृद्ध कथा म्हणून उर्मिला सिरुर यांच्या कथांचे वेगळेपण स्पष्ट करता येते.

**निष्कर्ष :**

१. उर्मिला शिरुर यांच्या कथा वास्तववादी व संपूर्णतः संभवनेयतेला धरुन आहेत.

२. उर्मिला शिरुर यांच्या कथेतील स्त्री व्यक्तिरेखा जिवंत, प्रत्ययकारी आहेत.

३. उर्मिला शिरुर यांच्या कथेतील नायिका स्वतंत्र बंडखोर विचारांच्या आहेत.

४. एकीकडे स्वतंत्र विचारसरणी तर दुसरीकडे पारंपारिक दृष्टीकोन या द्वंद्वात सापडलेल्या स्त्रीचे अनुभवविश्व साकारण्यात या कथा यशस्वी झाल्या आहेत.

## संदर्भ सूची :-

१. कवडसा - उर्मिला सिरुर

२. स्त्रियांची नवकथा : वाटा आणि वळणे - मंगला वरखेडे

३. स्त्रियांच्या नव्वदोत्तरी कथा : स्त्रीवादी आकलन- मंगला वरखेडे

RNI. MAHMUL02805/2010/33461

ISSN 0976-0377

Published, Printed, Owned by Sow. Mahananda B. Kamble & Edited by Dr. Balaji Kamble & Printed at Jyotichandra Offset Printing & Binding & Published by Jyotichandra Publication, 'Gyandev -Parvati'R-9/139/6, Near Vishal School, LIC Colony, Pragati Nagar, Latur. Dist.Latur-413531 (M.S.) India.

**Editor In Chief : Dr. Balaji Kamble, Mob. 9423346913**